DEPARTMENTAL EXAMINATION FOR SUBORDINATE SERVICES OF CO-OPERATIVE DEPARTMENT

Saturday, 14 May 2022

(Time : 2.30 p.m. to 5.30 p.m.)

(Maximum Marks - 100)

ACCOUNTS AND AUDITING – PAPER - II

(*Version* - English and Marathi) (Without Books)

N. B. : (1) Question No. 1 is compulsory. Solve any 5 questions out of remaining.

(2) Question No. 1 carries 25 marks and the remaining questions carry 15 marks each.

(3) English version is authentic.

---

1. From the following Trial Balance of Saideep Co-operative Society prepare Trading Accounts, Profit and Loss Accounts and Balance Sheet as on 31st March 2021. 25

Trial Balance as on 31st March 2021

Particulars	Debit Rs.	Credit Rs.
Share Capital		55,000.00
Shares Returns	3,000.00	
Opening Stock	16,400.00	
Purchases	31,100.00	
Direct Expenses	2,500.00	
Sales		50,000.00
Returns	1,980.00	
Rent and Taxes	6,000.00	
Bad Debts	400.00	
Reserve for Bad Debts		1,500.00
Discount	2,375.00	
Commission Received		255.00
Debtors and Creditors	20,250.00	18,500.00
Furniture	6,000.00	
Machinery	12,000.00	
Goodwill	7,500.00	
Wages and Salaries	7,000.00	
Salaries (for 10 months)	5,000.00	
Advertisement	9,000.00	
Investment in Debentures	8,500.00	
Loans and Advances		13,750.00

Adjustments.–

(1) Closing stock Rs. 17,250

(2) Rent of Rs. 4,000 has been prepaid.

(3) Provide 2% reserve for Bad Debts on Debtors. It was realised that own debtors worth Rs. 1000 proved to be bad and has to be written off.

(4) Write off depreciation @ 7.5% on machinery and 15% on furniture.

(5) Create discount on creditors @ 3%

2. Journalise the following transaction in the books of Rajendra 15

Year-2021

April 2021.

(1) Rajendra started business with cash Rs. 2,00,000. Building Rs. 2,00,000 and borrowed loan from Rakesh Rs. 50,000.

(3) Deposited cash into Dena Bank Rs. 50,000.

(5) Purchased computer from Sandeep of Rs. 30,000 @ 18% GST and paid by cheque.

(9) Cash Sales Rs. 90,000.

(11) Goods sold on credit to Ganesh Rs. 10,000 at 5% trade discount.

(12) Ganesh returned goods of Rs. 950.

(14) Goods taken by Rajendra for his personal use Rs. 1,000.

(17) Paid Telephone charges Rs. 500 and taxi fare Rs. 200.

(19) Paid Transport charges Rs. 5000 @ 5% GST.

(20) Paid Audit fees Rs. 5000 by cheque.

(21) Purchased furniture of Rs. 70,000 and amount paid by cheque @ 12% GST.

(22) Sold motor car worth Rs. 1,00,000 @ 18% GST and sales proceeds credited to our account.

(25) Paid cash to Keshav Rs. 15,500 who allowed as discount Rs. 500.

3. Write a short note on. 15

(1) Annual General Meeting

(2) Non-Performing Assets

(3) Special Report

(4) Audit Rectification Report

(5) Test Audit

4. Explain difference between 15

(1) Capital Expenditure and Revenue Expenditure

(2) Statutory Audit and Internal Audit

(3) Fixed Asset and Current Assets

(4) Accounting and Auditing

(5) Vouching and Verification.

5. Fill in the blanks. 10

(A) (1) Annual General Body meeting of co-operative society should be convened within ..... from the close of the financial year.

(2) ..... is a statutory reserve created from net profit of co-operative societies.

(3) Liquid Asset is .....

(4) A person is known as ..... if he is unable to pay his debts in full.

(5) Bank provide overdraft facility in ..... Account.

(6) Goodwill is ..... assets.

(7) Maximum repayment period of loan under Kissan Credit Card Scheme is .....

(8) .....is a statements containing the various ledger balances on a particular date.

(9) When a transaction has not been recorded in the books of accounts either wholly or partially such errors are called as .....

(10) Preliminary expenses are the best example of .....

(B) State whether the following statements are true or false. 5

(1) Co-operative society is corporate body distinct from his member.

(2) Entrance fees are treated as revenue receipt.

(3) Transfer fees are credited to repair fund.

(4) Under the Maharashtra Co-operative Societies Act an Auditor has under certain circumstances, a right to impounds the books or documents of society.

(5) Profit prior to incorporation are not available for divident and must be transferred to Capital Reserve.

6. Write full form. 15

(1) F.O.B. (2) F.I.F.O.

(3) G.D.P. (4) H.R.D.

(5) I.M.F. (6) K.Y.C.

(7) L.O.U. (8) N.P.A.

(9) R.S.P. (10) R.O.C.

(11) W.T.O. (12) S.L.R.

(13) R.W.A. (14) P.L.R.

(15) R.O.I.

7. What is the powers, rights and liability of Co-operative Auditor ? 15

(मराठी रूपांतर)

सूचना : (१) प्रश्न क्रमांक १ अनिवार्य आहे. उर्वरीत प्रश्नांपैकी कोणतेही ५ प्रश्न सोडवा.

(२) प्रश्न क्रमांक १ ला २५ गुण असून उर्वरित प्रत्येक प्रश्नास १५ गुण आहे.

(३) भाषांतरासाठी इंग्रजी माध्यमातील प्रश्नपत्रिका अधिकृत मानण्यात येईल.

---

१. साईदीप सहकारी संस्थेचे तेरीजपत्रकावरून दिनांक ३१ मार्च २०२१ अखेर मुदतीचे व्यापारी पत्रक, नफा-तोटा पत्रक व दिनांक ३१ मार्च २०२१ अखेरचे ताळेबंदपत्रक तयार करा. २५

तेरीजपत्रक दिनांक ३१ मार्च २०२१

तपशील	नावे रुपये	जमा रुपये
भाग भांडवल		५५,०००.००
भाग परत	३,०००.००	
सुरुवातीचा/आरंभी शिल्लक माल	१६,४००.००	
माल खरेदी	३१,१००.००	
प्रत्यक्ष खर्च	२,५००.००	
विक्री		५०,०००.००
विक्रीमाल परत	१,९८०.००	
भाडे व कर	६,०००.००	
बुडीत येणे	४००.००	
बुडीत निधी		१,५००.००
सूट	२,३७५.००	
कमिशन प्राप्त		२५५.००
व्यापारी येणे व व्यापारी देणे	२०,२५०.००	१८,५००.००
फर्निचर	६,०००.००	
मशिनरी	१२,०००.००	
गुडवील (नावलौकिक)	७,५००.००	
मजुरी व वेतन	७,०००.००	
वेतन (१० महिन्यांचे)	५,०००.००	
जाहिरात	९,०००.००	
रोखेमधील गुंतवणूक	८,५००.००	
कर्ज व अग्रीम		१३,७५०.००

खालील तरतुदींचा विचार करावयाचा आहे.

(१) अखेर शिल्लक माल रुपये १७,२५०.

(२) आगाऊ भाडे खर्च रुपये ४०००.

(३) व्यापारी येणेवर २% प्रमाणे संशयित व बुडीत निधीची तरतूद करा. व्यापारी येणेपैकी रुपये १००० येणी बुडीत झाल्याचे निदर्शनास आले आहे आणि ते निर्लेखित करावयाचे आहे.

(४) घसारा आकारणी-मशीनरीवर ७.५% आणि फर्निचरवर १५% परिणाम देऊन व्यवहार नोंदवा.

(५) व्यापारी देणेवर ३% कसर/सूट मिळाली.

२. श्री. राजेंद्र यांच्या व्यवहाराच्या किर्दवहीत नोंदी करा. १५

एप्रिल २०२१.

(१) श्री. राजेंद्र यांनी रुपये २,००,०००, इमारत रुपये २,००,००० तसेच श्री. राकेश यांचेकडून रुपये ५०,००० कर्ज उचल करून व्यवसाय सुरू केला.

(३) देना बँकेत रुपये ५०,००० रोख भरणा केला.

(५) श्री. संदीप यांचेकडून रुपये ३०,००० चे संगणक खरेदी १८% प्रमाणे जी.एस.टी. सह रक्कम चेकने अदा केली.

(९) रोख विक्री रुपये ९०,००० केली आहे.

(११) श्री. गणेश यांना ५% व्यापारी कसर देऊन रुपये १०,००० चा माल उधारीने विक्री केला आहे.

(१२) श्री. गणेश यांचेकडून रुपये ९५० चा विक्री केलेला माल परत आला.

(१४) श्री. राजेंद्र यांनी व्यक्तिगत उपयोगासाठी रुपये १,००० रकमेचा माल वापरला.

(१७) दूरध्वनी खर्च रुपये ५०० व टॅक्सी भाडे रुपये २०० रोख अदा.

(१९) वाहतूक भाडे रुपये ५००० अधिक ५% जी.एस.टी. सह अदा.

(२०) लेखापरीक्षण शुल्क रुपये ५००० चेकने अदा केले.

(२१) फर्निचर रुपये ७०,००० खरेदी व रक्कम १२% जी.एस.टी. सह चेकने अदा केले आहे.

(२२) वाहन विक्री रुपये १,००,००० अधिक १८% जी.एस.टी. सह रकमेस अदा केली.

(२५) श्री. केशव यांना रोख रक्कम रुपये १५,५०० रोख अदा केली व त्यांचेकडून रुपये ५०० सवलत मिळाली.

३. टिपा लिहा. १५

(१) वार्षिक सर्वसाधारण सभा

(२) अनुत्पादक जिंदगी

(३) विशेष अहवाल

(४) लेखापरीक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल

(५) चाचणी लेखापरीक्षण

४. खालीलपैकी फरक स्पष्ट करा. १५

(१) भांडवली खर्च व महसुली खर्च

(२) वैधानिक लेखापरीक्षण व अंतर्गत लेखापरीक्षण

(३) स्थावर मालमत्ता व जंगम मालमत्ता

(४) लेखा/लेखा जमाखर्चाचा हिशेब व लेखापरीक्षण

(५) प्रमाणक व सत्यापन

५. (अ) रिकाम्या जागा भरा. १०

(१) सहकारी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा आर्थिक वर्ष संपल्यानंतर ..... च्या आत बोलवली जाते.

(२) सहकारी संस्थेच्या निव्वळ नफ्यातून ..... हा वैधानिक निधी निर्माण केला जातो.

(३) तरल मालमत्ता म्हणजेच ..... होय.

(४) एखादी व्यक्ती तिची सर्व देणी देण्यास असमर्थ असते, तेव्हा त्यास ..... म्हणतात.

(५) बँका अधिकर्ष सवलत ..... खात्यावर देतात.

(६) गुडवील ही ..... संपत्ती आहे.

(७) किसान क्रेडीट कार्ड योजनेअंतर्गत कर्जाचा परतफेड कालावधी जास्तीत जास्त ..... इतका आहे.

(८) एका विशिष्ट दिनांकास सर्व खात्यावरील जमा व नावेची खतावणी बाकी दर्शविणाऱ्या पत्रकास लेखाशास्त्रात ..... म्हणतात.

(९) एखादा आर्थिक व्यवहार संपूर्णत: किंवा अंशत: हिशोबपुस्तकात नोंदविण्याचे राहून गेले आहे. अशा प्रकारच्या चुकीस ..... प्रकारची चूक म्हणतात.

(१०) प्राथमिक खर्च हे ..... मालमत्तेचे उत्तम उदाहरण आहे.

(ब) खालील विधाने चूक की बरोबर हे सांगा. ५

(१) कोणतीही सहकारी संस्था ही तीचे स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व असून ती सभासदांपेक्षा वेगळी/स्वतंत्र आहे.

(२) प्रवेश फी ही महसुली उत्पन्न आहे.

(३) ट्रान्सफर फी दुरुस्ती फंडाला जमा नोंदविली जाते.

(४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार लेखापरीक्षकास एका विशिष्ट परिस्थिती उद्‌भवल्यास संस्थेचे हिशोब पुस्तके व इतर दस्तऐवज कायदेशीरपणे जप्त करणे/ताबा घेण्याचा अधिकार आहे.

(५) नोंदणीपूर्व नफा हा लाभांश वाटपासाठी उपलब्ध नसतो आणि तो भांडवली निधीसच वर्ग करणे आवश्यक आहे.

६. खालील संक्षिप्त शब्दांचे पूर्ण रूप लिहा. १५

(१) एफ.ओ.बी. (२) एफ.आय.एफ.ओ.

(३) जी.डी.पी. (४) एच.आर.डी.

(५) आय. एम.एफ. (६) के.वाय.सी.

(७) एल.ओ.यू. (८) एन.पी.ए.

(९) आर.एस.पी. (१०) आर.ओ.सी.

(११) डब्ल्यू.टी.ओ. (१२) एस.एल.आर.

(१३) आर.डब्ल्यू.ए. (१४) पी.एल.आर.

(१५) आर.ओ.आय.

७. सहकारी लेखापरीक्षकाचे अधिकार व कर्तव्य आणि जबाबदाऱ्या काय आहेत ? १५